# प्रकरण – 2

# संस्थेची कर्तव्य व कामे याविषयची माहिती

महापालिका विश्लेषक प्रयोगशाळा ही प्रशासकीय, रासायनिक आणि सूक्ष्मजीवशास्त्र अशा विभागांमध्ये विभागलेली असून सुमारे **११,७००चौरस फुट** क्षेत्रामध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. प्रशासकीय कर्मचा-यांना व्यवस्थापनाचे चांगले कौशल्य असून ते आवश्यक कागदपत्रे व नोंदी व्यवस्थित ठेवतात. तसेच संसाधने, उपकरणे आणि सेवांची वेळेवर उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विक्रेते आणि सेवा पुरवठादार यांच्याशी चांगला समन्वय ठेवला जातो.

नमुना चाचणीसाठी प्रयोगशाळा मान्यताप्राप्त व प्रमाणित पध्दतींचे पालन करते. यामध्ये खालील मानकांचा समावेश आहे.

1. BIS ( Bureau Of Indian Standard )
2. FSSAI Manual Methods
3. AOAC ( Association Of Official Analytical Chemists )

प्रयोगशाळेत आवश्यक अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध असून त्यांची योग्य देखभाल व कॅलिब्रेशन नियमितपणे केली जाते.

रसायनशास्त्र व सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील तांत्रिक कर्मचारी कुशल,पात्र व अनुभवी आहेत. दर्जेदार चाचण्या आणि वेळेवर अहवाल तयार करण्यासाठी कर्मचारी नियमित प्रशिक्षण व कार्यशाळांमध्ये सहभागी होतात, ज्यामळे त्यांचे वैज्ञानिक ज्ञान व कौशल्य सतत अदययावत राहते. **कौशल्य वृध्दीसाठी प्रवीणता चाचणी** (PT) आणि **आंतर-प्रयोगशाळा तुलना** ( ILC ) कार्यक्रमांमध्येही सहभाग घेतला जातो.

गुणवत्ता व्यवस्थापन पध्दतीनुसार सर्व प्रक्रिया काटेकोरपणे राबवल्या जातात. दस्तऐवज व नोंदी ISO/IEC/17025 च्या निकषांनुसार व्यवस्थित राखल्या जातात. तसेच ग्राहकांच्या गरजा ओळखून त्यांना आवश्यक मार्गदर्शन दिले जाते आणि त्यांच्या समाधानासाठी सर्वोत्तम सेवा प्रदान केल्या जातात.

जानेवारी २०२३ पासून प्रयोगशाळेत तांत्रिक माहिती नोंदवण्यासाठी आणि अहवाल तयार करण्यासाठी स्वतःची संगणकीकृत सॉफ्टवेअर प्रणाली '**अन्न आणि जल गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली** ( FWQMS )' लागू करण्यात आली आहे. यामुळे ग्राहकांना मोठा फायदा झाला असून ते थेट प्रणालीमध्ये प्रवेश करून वेळेवर चाचणी अहवाल प्राप्त करू शकतात.

प्रयोगशाळा व्यवस्थापनाने कर्मचा-यांसाठी योग्य धोरणे, कार्यपध्दती आणि सुरक्षा साधने उपलब्ध करून दिली आहेत. विश्लेषण करताना **चांगल्या अन्न प्रयोगशाळा पध्दती** ( GFLP ) चे पालन केले जाते. यामुळे कर्मचारी सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरणात कार्यक्षमतेने काम करू शकतात.